0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) दक्षता शाखेकडून दिनांक १८/०२/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.
२) पोलिस उपनिरिक्षक, भिवंडी तालुका पोलिस ठाणे, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे यांचे दिनांक ०१/०३/२०१२ रोजीचा अहवाल.
३) पोलिस निरिक्षक, भिवंडी तालुका पोलिस ठाणे, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे यांचे दिनांक १४/०३/२०१२ रोजी फॅक्सद्वारे प्राप्त झालेला अहवाल.
४) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०५/२०१२/जा.१४१, दिनांक १५/०३/२०१२ व ०२/०४/२०१२.
५) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०५/२०१२/जा.१४२, दिनांक १५/०३/२०१२.
६) गोदामाचे मालकझवेरीचंद हरिया यांचे दिनांक २८/०३/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.
७) मुलजीभाई वालजी कटारमल यांचे दिनांक ०९/०५/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०५/२०१२/जा. ४८४
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.
दिनांक :- १७/०७/२०१२.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ११/०२/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या पथकास खात्रीलायक बातमी मिळाली की, भिवंडी येथील भारतीय खाद्यनिगमच्या गोदामातून दिनांक १०/०२/२०१२ रोजी उचल केलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गव्हाचा साठा मेसर्स गणराज डेव्हलपर्सच्या जयराज कॉम्प्लेक्स मधील गोदामामध्ये अनधिकृतपणे साठवूण ठेवला आहे. मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार वरील पथकाने १२.२५ वाजता भिवंडी कामण रस्त्यावरील मेसर्स प्रगती क्वारी, कलवार येथे दोन पंचांसह मेसर्स प्रगती क्वारी समोरील भिंवडी काम रस्त्या ओलांडून रस्त्याच्या पलिकडील संकूलाजवळ चालत गेले. सदर संकूलाच्या बाहेर गणराज डेव्हलपर्स, जयराज

कॉम्प्लेक्स असा फलक लिहिलेल्या प्रवेशद्वारामधून आत प्रवेश केल्यानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूला विकसीत गोदामाच्या रांगा निदर्शनास आल्यानंतर संकुलात प्रवेश केला. त्या दिशेने अंदाजे पाच मिनिटे पायीचालत जाऊन पथक पंचांसह उचव्या बाजूस वळले व काही पावले चालल्यानंतर पुन्हा डाव्या बाजूस चालत राहिले. त्या ठिकाणी सुध्दा रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या विकसीत गाळ्यांची पथकाने पंचांसह जाऊन पहाणी केली. रस्त्याच्या डाव्या बाजूस असलेल्या गोदामाच्या रांगेतील महाराष्ट्र शासन सेवार्थ, शालेय पोषण आहार योजना, गोदाम क्र. १, भिवंडी, जि. ठाणे असा मजकूर लिहिलेल्या गाळा सोडून बांधकामसुरु असलेल्या जिन्यालगतच्या गाळ्यात पथक पंचासोबत पोहचले. त्यावेळी सदरचा गाळा कुलूप बंद अवस्थेत आढळून आला. पथकाने पंचासमक्ष सदर गाळ्याच्या बाहेरील ओट्यावर पहाणी केली असता, तेथे गहू सांडला असल्याचे पथकास आढळले. त्यानंतर पथकातील अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष रस्त्यावरील व्यक्तीकडे त्याबाबत विचारणा केली असता पथकास माहिती मिळू शकली नाही.

दरम्यानच्या काळात सदर ठिकाणी एक व्यक्ती उपस्थित झाली. त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने त्याचे नांव दिलीप सुखदेव पवार असे सांगून तो मेसर्स गणराज डेव्हलपर्समध्ये व्यवस्थापक म्हणून गेल्या ३/४ महिन्यांपासून नोकरी करीत असल्याचे सांगितले. पंचांसमक्ष अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे सदर गाळा मालकाबद्दल व गाळ्यातील साठ्याबाबत चौकशी केली. तथापी, त्यांनी ते स्वत: गणराज डेव्हलपर्सचे व्यवस्थापक असून विकसीत गाळे इच्छूक व्यापाऱ्यांना विकण्याचे काम केल्यानंतर सदर गाळा मालक गाळ्याचा वापर स्वत:करिता करतो. अथवा भाड्याने देतो. तसेच गाळ्यामध्ये कशाची साठवणूक होते याची त्याच्याकडे कोणतीही लिखीत नोंद केली जात नाही, असे त्यांनी सांगितले. परंतू सदर गाळ्यामध्ये काळाबाजाराने साठेबाजी केल्याची पथकास खात्री असल्याने सदर गाळ्याचे कुलूप तोडून व गाळा डघडून आतील साठ्याची खातरजमा करणे आवश्यक असल्याची पथकाने पंचांसमक्ष चर्चा करुन पंचांना तसे समजावून सांगितले. दरम्यानच्या काळात पथकाने भिवंडी तालुका पोलिस ठाणे येथे जाऊन ठाणे अमलदारांची प्रत्यक्ष भेट घेतली व घटनास्थळाची परिस्थिती व वस्तूस्थिती त्यांना समजावून सांगितली आणि करावयाच्या अपेक्षित कारवाईच्या वेळी पोलिस पाठविण्याची विनंती केली. त्यानुसार भिवंडी तालुका पोलिस ठाणे येथील पोलिस शिपाई सर्वश्री एन. व्ही. मोहिते बक्कल क्र. १००७ आणि एस.एम. चौधरी बक्कल क्र. १४६३ हे घटनास्थळी हजर झाले. तसेच पंच व पोलिस शिपायांना करावयाच्या कारवाईची माहिती देऊन रितसर पंचनामा करुन गाळ्याच्या शटरचे कुलूप तोडण्याची कारवाई सुरु केली. सदर गाळा दोन कुलूपांनी बंद केलेला असून दोन्ही बाजूच्या कुलूपांवर १४५८५ असा क्रमांक असल्याचे पंचांना व पोलिसांना दाखविले. त्यानंतर पथकातील अधिकाऱ्यांनी पंच व उपस्थित पोलिस शिपाई यांच्या समक्ष गाळ्याची दोन्ही कुलूपे हातोड्याच्या

सहाय्याने तोडून गाळ्याचे शटर उघडले व सर्वांनी गाळ्यात प्रवेश केला. त्यावेळी गाळ्याच्या दर्शनी भागात प्लॅस्टिकच्या रिकाम्या गोण्या अस्थावस्त पडल्याचे आढळले. तसेच गाळ्याच्या डाव्या व उजव्या दोन्ही बाजूला भरलेल्या गोण्या ठेवल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर गाळ्यामधील साठ्याची पडताळणी केली असता, गाळ्यामधील डाव्याबाजूस ज्युट बारदान व प्लॅस्टिक बारदानमध्ये गव्हाचा साठा व उजवीकडील बाजूस ज्युट बारदान व प्लॅस्टिक बारदानमध्ये तांदळाचा साठा असल्याचे निदर्शनास आले. त्याशिवाय गाळ्यामध्ये प्लॅस्टिक व ज्युटची रिकामी बारदाने, गोणी शिलाई मशीन, दोन वजन काटे, गोणी शिवण्यासाठी वापराचे दाभण, सुतळी धागा, चाळण, घमेले व इन्व्हर्टर असा मुद्देमाल अधिकाऱ्यांना आढळून आला.

त्यानंतर पंचांसमक्ष अधिकाऱ्यांनी रिकामी ज्युट बारदाने तपासले असता, त्यावर भारतीय खाद्य निगम असा शिक्का असल्याचे दिसून आले. याबाबत अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पंच व पोलिस शिपाई यांच्या समक्ष रितसर पंचनामा करुन गाळ्यामधील संपूर्ण मुद्देमाल जप्त केला आणि पंचांसमक्ष सदर गाळा बंद करुन विकत आणलेली नविन कुलूपे लावून गाळा सिलबंद केला. त्यापूर्वी अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष गाळ्यामधील जप्त मुद्देमालामधून तांदूळ व गहू अंदाजे प्रत्येकी एक हजार ग्रॅमचे ४ नमुने प्लॅस्टिकच्या बरणीत घेऊन घटनास्थळी पंचासमक्ष सिलबंद केले.

अशाप्रकारे शासन नियंत्रित तांदूळ व गव्हाचा अवैधरित्या साठा अज्ञात व्यक्तीने केल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळी ताब्यात घेतलेल्या भारतीय खाद्य निगम शिक्का असलेल्या रिकाम्या गोण्या, गोणी शिवण्याचे मशिन, दाभन, सुतळी, चाळणी इत्यादी वस्तूंचा उपयोग करुन शासन नियंत्रित गहू तांदूळाचा साठा शिधावाटप दुकानांत न उतरविता घटनास्थळी आणून त्याचा गैरवापर करण्याचा अज्ञात व्यक्तीचा हेतू यातून स्पष्ट होत असल्यने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व ८, २) पी.डी.एस. ऑर्डर २००१, ३) बॉम्बे रेशनिंग एरिया शेड्युल्ड, कमोडीटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ६ तसेच ४) दि प्रिव्हेन्शन ऑफ ब्लॅक मार्केटिग ॲण्ड मेन्टेनन्स ऑफ सप्लाईज कमोडीटीज ॲक्ट १९८० चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द भिवंडी तालुका पोलिस ठाणे, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ।। ०२/२०१२ दिनांक ११/०२/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ज्युट बारदानमधील गव्हाचा साठा (१६० बाचके ५० किलो वजनाच्या) | ८००० किलो | ५७,६००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | प्लॅस्टिक बारदानमधील गव्हाचा साठा (१८ बाचके ५० किलो वजनाच्या) | ९०० किलो | ६,४८०/- |
| ३ | ज्युट बारदानमधील तांदळाचा साठा (६१० बाचके ५० किलो वजनाच्या) | ३०५० किलो | २,९२,८००/- |
| ४ | प्लॅस्टिक बारदानमधील तांदळाचा साठा (६ बाचके ५० किलो वजनाच्या) | ३०० किलो | २,८८०/- |
| ५ | ज्युट बारदानमधील तांदळाचा खुला साठा | २२० किलो | २,११२/- |
| ६ | रिकामी ज्युट बारदाने | ४५० नग | ६,७५०/- |
| ७ | रिकामी प्लॅस्टिक बारदाने | ३००० नग | ३०,०००/- |
| ८ | बारदान शिलाई मशीन | १ नग | १,२५०/- |
| ९ | वजन काटे | २ नग | १०,०००/- |
| १० | दाभण, चाळण, घमेले, सुतळ व धागा इ. | प्रत्येकी १ नग | २५०/- |
| ११ | इन्व्हर्टर संच | १ नग | ५,०००/- |
| १२ | तोडण्यात आलेली कुलूपे | २ नग | १००/- |
| | | एकूण | ४,१५,२२२/- |

सदर गुन्हा नोंद प्रकरणी सर्वसंबंधितांना जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-ब अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावणे करीता पोलिसांच्या पुढील तपासामध्ये गोदाम मालक, जप्त साठयाचा मालक अथवा जप्त साठयाचा पुरवठादार याचा सद्यस्थितीच्या अहवालामध्ये अंतर्भाव होणे आवश्यक असल्याने, जप्त केलेल्या मुद्देमालाबाबत अंतीम निर्णय घेणे सुलभ होण्यासाठी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, भिवंडी तालुका पोलिस ठाणे, जिल्हा ठाणे यांना या कार्यालयाचे पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०५/२०१२/जा.९८, दि.२३/०२/२०१२ रोजी निर्गमित केलेल्या पत्रान्वये पुढील तपासाचा अहवाल सादर करण्यास सूचित करण्यात आले.

पोलीस उपनिरीक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी भिवंडी तालुका पोलिस ठाणे यांचे वाचावे क्र. २ अन्वये, सदर गुन्हाचा तपास चालू असून, गुन्ह्यात आरोपीत नामे मुलजीभाई वालजी कटारमल यास दि.१६/०२/२०१२ रोजी १०.२५ वाजता अटक करुन दि.२०/०२/२०१२ रोजी पर्यंत पोलिस कस्टडी रिमांड घेण्यात आली असून आरोपीस सद्या मा. न्यायालयातून जामीनावर मुक्त आहे. आरोपीताकडे गुन्ह्याचे संदर्भात तपास केला असता, सदर गोदामातील गाळा क्र. ४ हा आरोपीत याने ॲग्रीमेंट करार करुन भाड्याने घेवून धंदा करत असल्याचे निष्पन्न झाले आहे, असे नमूद केले आहे. तसेच त्यांचे वाचावे क्र. ३ च्या अहवालान्वये, पोलिस कस्टडी दरम्यान आरोपीत मुलजीभाई वालजी मंगे याचेकडे गुन्ह्यातील मुद्देमालासंदर्भात विचारपुस करण्यात आले असून सदरचा मुद्देमाल हा आरोपीत याने सदर कॉम्पेक्समधील गोदामात रात्रीच्या वेळी गहू, तांदूळ घेऊन येणारे मोटार ट्रकच्या ड्रायव्हर व मजूर हे एक दोन गोण्या देत होते, असे सांगून सदरचा सर्व मुद्देमाल जमा करुन नमूद गाळ्यात ठेवण्यात

CONTROLLER OF RATIONING HEAD OFFICE MUMBAI

आले असल्याचे सांगितले. तसेच सदर ट्रकचे नंबर व ड्रायव्हर, मजूर यांची नावे माहित नसल्याचे आरोपीत याने सांगितल्याचे नमूद केल आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २८/०३/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस गोदामाचे मालक झवेरीचंद हरिया यांच्या वतीने वकालतनाम्यासह ॲड. एस. ऐ. अन्सारी हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मुलजीभाई वालजी कटारमल हे उपस्थित राहिले व त्यांनी लेखी निवेदन सादर करण्यास नकार देऊन, सदरचा जप्त करण्यात आलेला अन्नधान्यांचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे सांगून सदरचा साठा त्यांनी अनधिकृतरित्या त्यांच्या गोदामासमोर असलेल्या भारतीय खाद्य निगम येथील अन्नधान्य भरलेल्या गाडीवाल्यांकडून घेतल्याचे सांगून सदरचा साठा त्यांना परत मिळावा म्हणून सांगितले. गोदामाचे मालक झवेरीचंद हरिया यांच्या वतीने उपस्थित ॲड. एस. ऐ. अन्सारी यांनी गोदाम मालकीबाबतचे आवश्यक पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक ०८/०५/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस गोदामाचे मालक झवेरीचंद हरिया यांच्या वतीने वकालतनाम्यासह ॲड. एस. ऐ. अन्सारी यांनी उपस्थित राहून मागील सुनावणीस सुचित केल्यानुसार गोदाम मालकीबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे म्हणून ग्रामपंचायत कालवार यांचे २०११-१२ करिता असलेली करपावती सादर केली. तसेच त्यांच्या गोदामातील जप्त अन्नधान्य साठ्याबाबत त्यांचा संबंध नसून सदर साठ्याचे नियमानुसार विल्हेवाटीस त्यांची काही हरकत नसल्याचे सांगितले. सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस गोदामाचे मालक झवेरीचंद हरिया यांच्या वतीने वकालतनाम्यासह उपस्थित ॲड. एस. ऐ. अन्सारी यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात, भिवंडी तालुका पोलिस स्टेशन, भिवंडी यांनी दिनांक ११/०२/२०१२ रोजी गुन्हा क्र. II ०२/२०१२, १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व ८, २) पी.डी.एस. ऑर्डर, २००१, ३) बॉम्बे रेशनिंग शेड्युल्ड, कमोडीटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ६ तसेच ४) दि प्रिव्हेन्शन ऑफ ब्लॅक मार्केटिंग ॲण्ड मेन्टेनन्स ऑफ सप्लाईज कमोडीज ॲक्ट १९८० चा भंग केल्यावरुन गुन्हा नोंद केला असून सदर गुन्ह्यात मुद्देमाल जप्त करण्यात आले असून सदर मुद्देमाल त्याचे मालकी व वहिवाटीचे गाळामध्ये जप्त करण्यात आला आहे व आजपर्यंत ते त्याच्या गाळात जप्त करुन ठेवण्यात आले आहे. सदर गुन्ह्यात दर्शविलेल्या गाळेचा तो मालक असून सदर गाळा मुलजीभाई वालजी कटारिया यांचे सांगणेवरुन त्यांना दिनांक ०२/०२/२०१२ रोजी ११ महिनेसाठी औद्योगिक प्रयोजनार्थ वापरण्यासाठी भाड्याने दिला आहे. सदर गाळा भाड्याने दिल्यानंतर त्याचा कब्जा मुलजीभाई यांना दिनांक ०२/०२/२०१२ रोजी देण्यात आले होते व सदर गाळाचा ते गैरवापर करणार नाही असेही ठरविण्यात आले होते. आपले कार्यालयाद्वारे सदर गुन्ह्यात गहू व इतर वस्तू जप्त करण्यात आली असून ते आजरोजी त्याचे मालकी व कब्जेचे गाळात ठेवण्यात आली आहे व कायद्याने गहू हे खराब होणारे वस्तू असून ते त्वरीत विल्हेवाट लावणे गरजेचे असून ते त्याचे गाळयात ठेवले असल्यामुळे ते खराब होण्याचे शक्यता नाकारता येत नाही. तसेच जप्तीचे माल ते शासनांकडे जप्त करण्यात आले असून ते शासनाकडे ठेवले पाहिजे. पण आजरोजीपर्यंत ते जप्त मुद्देमाल त्याचे गाळ्यात ठेवले आहे. ते बेकायदेशिर आहे व सदर गाळा त्याने मुलजीभाई यांना भाडेने दिले असल्यामुळे सदर गुन्ह्यात त्याचे काही लेने देणे नाही व जप्त मुद्देमालाबाबत आपले द्वारे करण्यात येणारी कारवाईबाबत त्याची काही तक्रार नसून सदर गाळ्यात ठेवलेले जप्तीचे मुद्देमाल खाली करुन सदर गाळा त्याच्या कब्जात परत मिळणेचे गरजेचे आहे. कारण त्याचे व वालजीभाई यांचे आपसात झालेले भाडेकरार रद्द केले आहे. तरी त्याचे कब्जे व वहिवाटीचे गाळा खाली करुन ते त्याला त्वरीत परत करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

मुलजीभाई वालजी कटारमल यांचे दिनांक ०९/०५/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, भिवंडी तालुका पोलिस स्टेशन, भिवंडी यांनी दिनांक ११/०२/२०१२ रोजी गुन्हा क्र. II ०२/२०१२, १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ व ८, २) पी.डी.एस. ऑर्डर, २००१, ३) बॉम्बे रेशनिंग शड्युल्ड, कमोडीटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ६ तसेच ४) दि प्रिव्हेन्शन ऑफ ब्लॅक मार्केटिंग ॲण्ड

मेन्टेनन्स ऑफ सप्लाईज कमोडीज ॲक्ट १९८० चा भंग केल्यावरुन गुन्हा नोंद केला असून सदर गुन्ह्यात मुद्देमाल जप्त करण्यात आले असून सदर मुद्देमाल त्याचे भाडेच्या असलेल्या गाळात सिल लावून ठेवण्यात आले आहे व सदर गुन्ह्यात पोलिसांनी त्याला अटक करुन तो कोर्टाचे परवानगी किंवा आदेशाने जामिनवर सुटेलेला आहे व आज़रोजी ही सदर गुन्हा मे. कोर्टात जारी असून त्याचा निकाल लागला नाही व सदर गुन्हे त्याने केला आहे हे सिध्द झाले नाही, म्हणून सदर जप्त मुद्देमाल वर त्याचे मालकीचे आहे किंवा शासनाचे आहे हे सिध्द होत नाही. सदर गुन्ह्यात जप्त मुद्देमाल ओपन मार्केटमध्ये विकतात तसेच बारदान पण अधिकृत शिधावाटप दुकानदार ते बारदान खरेदी करणारे लोकांना विकतात म्हणून तो शासनाचे आहे हे सिध्द होत नाही. तसेच ते बारदान व गव्हाचा साठा, तांदळाचा साठा शासनाचे आहे किंवा शासनाने शिधावाटप दुकानात उतरविणे करीता दिले होते असे कुठून ही उल्लेख नाही, सदर साठ्यावर शासन सिल किंवा शासनाद्वारे कुठल्याही प्रकारचे बारदानचे नंबर व ते कुठून आणले असेल किंवा शासनाचे कोणते गोदामामध्ये कोणते गाडीद्वारे निघाला आहे. याबाबत शासनाकडे काही पुरावे नाही, केवळ बारदानवर शासनाचे नांव नमूद होते हे म्हणून सदर जप्त मुद्देमाल शासनाचे आहे हे सिध्द होत नाही, तसेच वजन काटे, शिलाई मशीन, चाळण, घमेले, सुतळ व धागा, इन्व्हर्टर संच हे शासनाचे आहे, याबाबत काही उल्लेख नाही व ते शासनाचे नसून त्याचे मालकीचे आहे, रिकामी बारदान मार्केटमध्ये उपलब्ध असून ते कोणीही व्यक्ति खरेदी करु शकतो व त्याबाबत कोणतेही प्रकारचे कागदपत्रांचे पुरावे देतां येत नाही, त्याचे म्हणणे आहे की, सदर जप्त मुद्देमाल ओपन मार्केटमध्ये उपलब्ध असून त्याने लोकांकडून गहू व तांदूळ खरेदी केला असून ते दहा किलो कधी कधी जास्त त्याला विकत होते व त्यांचेशी खरेदी केल्याचे पावती मिळणे गरजेचे नव्हते व ते लोक पावती देणे असमर्थ असू शकतात, म्हणून जप्त मुद्देमाल त्याने लोकांकडे खरेदी केले असल्याचे कागदपत्रांचे पुरावे नाही, म्हणून सदर जप्त मुद्देमाल हे शासनाचे आहे हे संशयची बाब असून सदर जप्त मुद्देमाल विल्हेवाट लावणे बाबत त्याची हरकत असून, जप्त मुद्देमाल त्याला परत करण्यांत यावे. गुन्ह्यात जप्त मुद्देमाल चोरीचे किंवा ब्लॅक मार्केटिंग करिता आहे हे आजरोजी हि सिध्द झाले नाही म्हणून आपणांस सदर जप्त मुद्देमाल विल्हेवाट लावण्याचा अधिकार नाही म्हणून त्याची हरकत आहे. तरी गुन्ह्यात जप्त मुद्देमाल त्याला त्वरीत परत करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ११/०२/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार दिनांक १०/२/२०१२ रोजी उचल केलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गव्हाचा साठा, अंजुर वसई रोडवरील कालवार गांव येथील मे. गणराज डेव्हलपर्सच्या जयराज कॉम्प्लेक्स मधील गोदाम क्र सी- ६/४ या गोदामामध्ये अनधिकृतरित्या साठवणूक केल्याची खबर मिळाल्याने दिनांक ११/०२/२०१२ रोजी या कार्यालयाच्या दक्षता पथकाने धाड टाकुन कुलुप बंद असलेल्या अनधिकृत गोदामाचे भिवंडी तालुका पोलिस ठाण्याकडून पाचारण करण्यात आलेल्या दोन पोलिस शिपाई यांच्या समक्ष कुलुप तोडून सदर गोदामातील अनधिकृतरित्या साठवणूक केलेल्या शासननियंत्रीत दराचा एकुण ४,१५,२२२/- रुपये किंमतीचा अन्नधान्याचा साठा इ. मुद्देमाल जप्त करुन अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

प्रस्तूत प्रकरणी, या कार्यालयाच्या अधिपत्त्याखालील फिरते पथकाने नमूद गोदामावर भेट दिली असता, सदर गोदाम कुलूप बंद असल्याचे आढळून आले. मे. गणराज डेव्हलोपर्सचे व्यवस्थापक दिलीप सुखदेव पवार यांना घटनास्थळी पाचारण करुन गोदाम मालकाबाबत चौकशी केली असता, त्यांनी सदरचे गोदाम मुलजी कटारमल यांच्या ताब्यात असल्याचे सांगून त्याने मुलजी कटारमल यांना भ्रमणध्वनी क्र. ९८९२०४४८५७ वर संपर्क साधले असता, ते मुंबई बाहेर असल्याचे सांगून उडवाउडवीचे उत्तरे दिली. तसेच पोलिसांनी सादर केलेल्या अहवालामध्ये पोलिस कस्टडी दरम्यान आरोपीत मुलजीभाई वालजी कटारमल याचेकडे गुन्ह्यातील मुद्देमालासंदर्भात विचारपूस करण्यात आले असून सदरचा मुद्देमाल हा आरोपीत याने सदर कॉम्पेक्समधील गोदामात रात्रौच्या वेळी गहू, तांदूळ घेऊन येणारे मोटार ट्रकच्या ड्रायव्हर व मजूर यांच्याकडून घेतल्याचे सांगून सदर ट्रकचे नंबर व ड्रायव्हर, मजूर यांची नावे माहित नसल्याचे आरोपीत याने सांगितल्याचे नमूद केले आहे.

मुलजी कटारमल यांनी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, सदर गुन्ह्यात जप्त मुद्देमाल ओपन मार्केटमध्ये विकतात तसेच बारदान पण अधिकृत शिधावाटप दुकानदार ते बारदान खरेदी करणारे लोकांना विकतात म्हणून तो शासनाचे आहे हे सिध्द होत नाही. सदर साठ्यावर शासन सिल किंवा शासनाद्वारे कुठल्याही प्रकारचे बारदानचे नंबर व ते कुठून आणले असेल किंवा शासनाचे कोणते गोदामामध्ये कोणते गाडीद्वारे निघाला आहे. याबाबत शासनाकडे काही पुरावे नाही, केवळ बारदानवर शासनाचे नांव नमूद होते हे म्हणून सदर जप्त मुद्देमाल शासनाचे आहे हे सिध्द होत नाही. सदर जप्त मुद्देमाल ओपन मार्केटमध्ये उपलब्ध असून त्याने लोकांकडून गहू व तांदूळ खरेदी केला असून ते दहा किलो कधी कधी जास्त त्याला विकत होते व त्यांचेशी खरेदी केल्याचे पावती मिळणे गरजेचे नव्हते व ते लोक पावती देणे असमर्थ असू शकतात, म्हणून जप्त मुद्देमाल त्याने लोकांकडे खरेदी केले असल्याचे कागदपत्रांचे पुरावे नाही, म्हणून सदर जप्त मुद्देमाल विल्हेवाट लावणे बाबत त्याची हरकत असून,

जप्त मुद्देमाल त्याला परत करण्यात यावे, असे नमूद केले आहे. सदरचे निवेदन हे मोघम स्वरुपाचे असून त्यांनी शासनाचे दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविक पाहता मुलजीभाई वालजी कटारमल यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या मौखिक खुलाशात, सदरचा जप्त करण्यात आलेला अन्नधान्यांचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे सांगून सदरचा साठा त्यांनी अनधिकृतरित्या त्यांच्या गोदामासमोर असलेल्या भारतीय खाद्य निगम येथील अन्नधान्य भरलेल्या गाडीवाल्यांकडून घेतल्याचे कबूल केले आहे. तसेच घटनास्थळी जप्त करण्यात आलेले रिकामे ज्युट व प्लॅस्टिकचे बारदाने, शिलाई मशिन, वजन काटे इ. मुद्देमालावरुन मुलजी कटारमल हे शासन नियंत्रित दराचा अन्नधान्याचा साठा हा गैरमार्गाने खरेदी करुन तो अवैधरित्या नमूद गोदामावर साठवणूक करुन सदरचा साठा हा इतर प्लॅस्टिकच्या बारदानामध्ये भरुन काळाबाजाराने विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगला असल्याचे सिध्द होत आहे. सबब, जप्त तांदूळ व गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०५/२०१२/जा.१४२, दिनांक १५/०३/२०१२ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी धाडीच्या वेळी घटनास्थळी आढळून आलेले ४५० नग रिकामी ज्युट बारदाने, ३००० नग रिकामी प्लॅस्टिक बारदाने, बारदान शिलाई मशीन, २ नग वजन काटे, दाभण, चाळण, घमेले, सुतळ, धागा, इन्व्हेटर संच, तोडण्यात आलेली कुलूपे इ. वस्तू शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये भिवंडी तालुका पोलिस ठाणे, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ०२/२०१२ दिनांक ११/०२/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) या कार्यालयाचे दिनांक १५/०३/२०१२ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले ४५० नग रिकामी ज्युट बारदाने, ३००० नग रिकामी प्लॅस्टिक बारदाने, बारदान शिलाई मशीन, २ नग वजन काटे, दाभण, चाळण, घमेले, सुतळ, धागा, इन्व्हेटर संच, तोडण्यात आलेली कुलूपे इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) गणराज डेव्हलपर्सचे व्यवस्थापक दिलीप सुखदेव पवार
२) मुलजीभाई वालजी कटारमल
३) गोदामाचे मालक
४) जप्त साठ्याचा पुरवठादार
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भिवंडी तालुका पोलिस ठाणे, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, भिवंडी तालुका पोलिस ठाणे, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. ०२, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.